INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# मुगलकालीन संगीत : एक अभ्यास

**मार्गदर्शक :-**
प्रा.डॉ.नरेश एल. गोंडाणे
श्रीमती राधादेवी गोयनका
महिला महाविद्यालय, अकोला.

**संशोधक :-**
प्रा.दिपक महादेव जामनिक
अशोक मोहरकर महाविद्यालय,
अडयाळ.

भारतीय संगीताच्या इतिहासात 'मुगलकाल' हा अतिशय महत्वाचा काळ होता. मुगलांनी भारतीय संगीताला कमी-अधिक प्रमाणात विकसीत करण्याचे काम केले होते व संगीताचा प्रचार प्रसार करण्याचे काम केले. मुगल राजांनी संगीतातील अनेक संगीतज्ञांना आपल्या दरबारात नियुक्त केले होते. संगीतज्ञानांचा मानसन्मान केला जात होता व त्यांना पुरस्कृत करून विशिष्ट प्रकारचे धन दिल्या जात होते. मुगलांच्या पूर्वी अनेक मुस्लीमांनी भारतावर आक्रमण केले. ते आक्रमण म्हणजे भारतातील खजिना, सोने, चांदी लुटण्याचे काम केले होते. ही सुरवात मुहम्मद गजनबी यांच्या कारकिर्दीपासून सुरूवात झाली होती. मुहम्मद गजनबी यांनी भारतावर बरेच वेळा आक्रमण केले व भारतातील खजिना घेऊन पुन्हा आपल्या देशात निघून गेले. परंतु काही मुस्लीमांना आपला भारत देश आवडला होता. ते भारतातच स्थायीक झाले व भारतावर अनेक वर्षापर्यंत राज्य केले. त्यात पहिला काळ म्हणजे सल्तनत काळ. हया काळात मोहम्मद गौरी, त्यानंतर कुतुबुद्दीन ऐबक, खीलजी काळातील अल्लाउद्दीन खीलजी. त्यानंतर तुघलक काळात मुहम्मद तुघलक व लोदी काळात बहोलाल लोदी, सीकंदर लोदी व इब्राहीम लोदी यांच्या काळात यांच्या दरबारात अनेक संगीतज्ञ राहत होते व या राजांनी संगीत कलेला आश्रय दिला होता. यांच्या काळात संगीतकलेचा विकास करण्याकरीता व प्रचार करण्याकरीता या वरील शासकांनी आपल्या सोबत अरब वरूण संगीतकार आणले होते व त्यांनी फारसी, अरबी, तुर्की या सारख्या भाषेचे मिश्रण करून संगीत कलेला समृध्द बनविले होते आणि संगीताचा प्रचार प्रसार केला होता.

Received: 05-02-2026 | Accepted: 12-03-2026 | Published: 19-03-2026 | www.ijeml.com

त्यानंतर इ.स.1526 मध्ये मुगल काळाला सुरवात झाली. या काळातील शासक संगीत कलेच्या दृष्टीने न्यायीक होते. त्यांचे संगीतावर अधिक प्रेम करूण संगीत कला विकसीत करण्यात फार मोठे योगदान दिले. मुगल काळाची सुरवात बाबर हुमायू, अकबर, जहांगीर, शहाजहां यासारखे मुगल शासक सांस्कृतिक विकासाचा प्रसार करणारे मुगल शासनकर्ते प्रीय होते.

राजा बाबर हे उच्च कोटीचे गायक व संगीतात विद्वान होते ते स्वत: गीतांची रचना करून गात होते. जेव्हा बाबर भारतात आले तेव्हा त्यांनी आपल्यासोबत गायक, वादक आणले होते तसेच बाबर यांना अरबीयन व तुर्की नृत्य अधिक आवडत होते. बाबर यांच्या राजदरबारामध्ये भारतीय संगीतातील धार्मिक व आध्यात्मिक गोष्टींचा विचार केला जात होता आणि बाबरच्या दरबारामध्ये सुफी संगीत, कव्वाली, गझले यासारखे गीत प्रकार गायल्या जात होते.

त्यानंतर राजा बाबर हयांचा मुलगा हुमायूँ यांनी राजसत्ता सांभाळली होती. राजा हुमायूँ यांच्या कालखंडामध्ये सुफी संगीताचा अधिक प्रचार झाला होता. सुफी गायनाची प्रस्तृतीकरण, त्यांच्या गायनांचा ढंग, त्यांचा स्वर लावण्याची पध्दत ही एक वेगळ्या ढंगाने संगीत गायल्या जात असल्यामुळे सुफी संगीताचा प्रभाव समाजावर जास्त झाला होता. त्यांचे संगीत मानवाच्या मनाला भिडणारे होते. राजा हुमायूँ यांच्या काळात ख्याल गायन, कव्वाली, किर्तन, भजन यासारख्या गीत प्रकाराच्या माध्यमातून संगीताचा विकास झाल्याचे दिसते.

हुमायू संगीतज्ञानांचे खूप आदर करायचे. हुमायूंना आत्मा, परमात्म्याचे संगीत आवड होते. हुमायूंच्या जीवनात निराशा असो की आनंदी असो, एवढेच नाही तर संकटकाळातही सुध्दा एकाग्रतेने संगीत ऐकत होते. त्यांना संगीत खूप प्रीय होते म्हणून ते मरेपर्यंत संगीताचे उपासक बनून राहिले. त्यांच्या कारकिर्दीस संगीताचा विकासच झाल्याचे दिसून येते. हुमायूँच्या दरबारात सोमवार व बुधवार संगीताची मैफील होत होती. बादशाहचे जेव्हा राजदरबारामध्ये आगमन होत होते. तेव्हा नगाड्याद्वारे संगीत वाजविल्या जात होते आणि याच काळात बैजू धृपद गायक राजाच्या दरबारात राहत होते. बैजूनी धृपद गायन शैलीच्या माध्यमातून हुमायूँला प्रभावीत केले होते.

याच काळात ग्वालीयरचे राजा 'मानसिंह तोमर' उच्च कोटीचे संगीतकार होते. तसेच त्यांच्या दरबारामध्ये अनेक संगीतज्ञ होते. त्यामध्ये सुप्रसिध्द गायक नायक बख्शू व बैजू उच्च कोटीचे गायक होते. बैजू हे राजा मानसिक तौमर यांच्या दरबारामध्ये चमकणारा रत्न होता. त्यांनी अनेक लोकप्रिय गीत व धृपद लिहीले. तसेच बैजू हे उत्कृष्ठ विणावादक होते.

हुमायूंच्या नंतर राजा अकबराच्या दरबारामध्ये अनेक संगीतज्ञ व अकबर संगीतज्ञ होते. त्यांचे संगीतावर अधिक प्रेम होते. राजा अकबराच्या कारकिर्दीमध्ये दोन प्रकारच्या घडामोडी झाल्याचे दिसून येते, एक इरानी संगीत पध्दती व दुसरी भारतीय संगीत पध्दती या दोन्ही संगीत पध्दतीच्या मिश्रणाने संगीत द्विगुणीत झाल्यामुळे संगीत कलेत एक वेगळे सौंदर्य व लोकप्रियता वाढल्याचे दिसुन येते. राजा अकबराच्या दरबारामध्ये प्रत्येक दिवसाला संगीत होत असे. भारतीय संगीतामध्ये धृपद शैली व ईरानी रागांच्या मिश्रणाने संगीताला एक वेगळा रूप आल्याचे दिसते. याच काळात स्वामी हरीदास (तानसेनचे गुरू), तानसेन, न्यामत खाँ (सदारंग), बाबा रामदास, नायक बख्शू, सुजानसिंह यासारखे कलाकार झाले होते. तसेच हयाच काळात संत, कवी व संगीतज्ञ जसे मिराबाई, सुरदास, कबिरदास, तुलसीदास नामक भक्त कवीच्या माध्यमातून संगीताचा प्रचार झाला.

अकबराच्या मृत्यूनंतर जहाँगीर बादशाह बनला होता. राजा जहागीर संगीताचा खूप शौकीन होता. त्यांच्या दरबारामध्ये अनेक गायक व नृत्य करणाऱ्या स्त्रिया होत्या. जहाँगीर संगीताचा प्रेमी होता, म्हणतात की संगीतामध्ये जहाँगीर एवढा विलीन व्हायचा की, त्याला जेवणाची सुध्दा आठवण राहत नव्हती. जहांगीरचा पुत्र शाहजहाँला पण संगीताची आवड होती. त्यांच्या दरबारामध्ये अनेक गायक, वादक होते व स्वत: शाहजहाँ सितार वादक व गायक होते. त्यांचे सितार वादनावर अधिक प्रेम होते.

शाहजहाँ यांचा सर्वात लहान मुलगा औरंगजेब याने आपल्या वडीलांना कैद केले आणि स्वत:च्या भावांना कायमचे संपवले आणि 31 जुलै 1658 रोजी दिल्लीच्या मुगल सिंहासनावर बसला. राजा बाबर पासून ते शाहजहाँ पर्यंत सर्व मुगल सम्राट हिंदु-मुस्लीम ऐक्य आणि त्यांच्या प्रजेची

समृध्दी पाहण्यास उत्सुक असतांना, औरंगजेब उलट होता. तो एक कट्टर सुन्नी मुस्लीम होता आणि देशातील प्रत्येक युवा तरूण व वृध्दांना इस्लाम धर्म स्विकारावा अशी त्याची इच्छा होती. ही इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याने असंख्य अत्याचार केले. हिंदु मंदिरे पाडण्यात आली. हिंदुंना दरबार व इतर सरकारी पदांवरून एक-एक करून काढण्यात आले. पूजा आणि धार्मिक विधीवर बंदी घालण्यात आली व नविन कर लादण्यात आले. नविन कायदे बनविण्यात आले आणि धर्मांतर करण्यास नकार देणाऱ्यांना मृत्यूदंडही देण्यात आला. अशा दगडहृदयी आणि अत्याचारी राजाच्या मनात कलेचे प्रेम कुठे होते? अशा व्यक्तीपासून कला दूर जाते. राजा औरंगजेबानी आपल्या दरबारातील सर्व संगीतकार, कवी आणि कारागीरांना दरबारातून हाकलून दिले आणि अनेक कलाकारांना मारण्यात आले.

राजा औरंगजेब हा संगीत कलेचा विरोधी होता. विरोधकांच्या यादीत सम्राट औरंगजेबाचे नाव नेहमीच प्रथम येते. काही संगीतातील विद्वान त्यांना संगीत कलेचा खुनी असेही म्हणतात. औरंगजेबाने आपल्या दरबारात तर संगीताला बंदी घातली होती. त्याचबरोबर काही इतर राज्यातही सर्व संगीत पध्दती, सादरीकरणे आणि प्रशिक्षणावर बंदी घातली होती.

अशाप्रकारे जेवढा संगीताचा विकास अकबराच्या काळात झाला तेवढा संगीताचा विकास कुठल्याच राजाच्या दरबारात झाला नाही. मुगल शासकांनी सांस्कृतीक विकासाचा प्रचार, प्रसार केला. मुगल काळात चित्रकलेने काही अधिकच प्रगती केली व चित्रकला ही शैली विकसीत झाल्याचे दिसून येते. अनेक चित्राद्वारे दृश्य ग्रंथात त्या काळातील पहायला मिळतात.

**अ) मुगलकालीन राजे महाराजांची संगीत कला संबंधीत भुमीका :-**

भारतीय संगीताच्या इतिहासाचा अभ्यास केला असता मुगल काळाच्या पुर्वी अनेक राजे महाराजे होऊन गेले की त्यांनी संगीत कलेचा प्रचार प्रसार केला व संगीत कलेला आश्रय दिला. राजे महाराजांचा उद्देश फक्त संगीत कलेचा विकासच करणे नव्हता तर अनेक देशावर आक्रमण करून त्या देशावर आपली सत्ता प्रस्थापित करणे हा सुध्दा होता. संगीत कलेचा मुख्य उद्देश राजे महाराजाचे मनोरंजनासाठी केला गेला. राजाच्या दरबारामध्ये प्रत्येक दिवशी संगीतकला सादर केल्या

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

जात होती. दरबारामध्ये अनेक गायक, वादक, नृत्य करणा-या स्त्रीया, चित्रकार इत्यादी कलाकार होते व संगीत कला संबंधीत ग्रंथकार होते. मुगल काळातील राजा अकबर यांचा काळ हा सुवर्णकाळ म्हणून ओळखल्या जातो. अकबराच्या दरबारात नऊ रत्न होते. मुगल काळातील महाराजांची संगीतकला संबंधीत भुमीका पुढीलप्रमाणे -

इ. स. 1526 मध्ये युध्दात लोदीला हरवुन भारतात मुगल साम्राज्य स्थापीत केले व इब्राहीम लोदीच्या मृत्युनंतर दिल्ली सल्तनत समाप्त झाला आणि मुगल काळाचा प्रारंभ सुरू झाला. राजा बाबर हा एक योध्दा, कवी आणि संगीतज्ञ होता. राजा बाबरने आपल्या दरबारात संगीतातील अनेक कलाकारांना आश्रय दिला होता. बाबरच्या दरबारात संगीतसंबंधी विविध प्रकारच्या चर्चा केल्या जात होत्या. वेळ मिळाल्यास बाबर संगीताचे आयोजन करत होता. जेव्हा सैनिक युध्दातुन परतल्यानंतर सैनीकांची थकावट दुर करण्यासाठी संगीताची मैफील श्रृंगारीक गीताव्दारे मनोरंजन करत होता.

इ.स. 1530 मध्ये राजा बाबरचा मुलगा हुमायूँ यांनी दिल्लीची राजसत्ता सांभाळली होती व मुगल सम्राट हमायूँ संगीत आणि संगीतकाराचे रक्षक करणारे होते. हुमायूँच्या दरबारात 29 संगीतकार होते व त्यांच्या दरबारात आठवडयामध्ये सोमवार आणि बुधवारला हया दोन दिवशी दरबारामध्ये संगीताचे कार्यक्रम आयोजीत केल्या जात होते. ते नेहमी आपल्यासोबत गायक, वादक घेऊन जायचे व संगीतकारांना संगीत कलेसंबंधी प्रोत्साहीत करणे त्यांचा मानसन्मान करणे आणि पुरस्कार देत होते. राजा हूमायूँ ने आग्रा येथे विजय प्राप्त केल्याच्या खुशीमध्ये एक महीन्यापर्यंत संगीताचे आयोजन केले होते तसेच नदीकाठी संगीत सभागृह बांधले होते त्याला नाव ‘तिलीस्म’ देण्यात आले. सुप्रसिध्द गायक बैजुची गझले ऐकुन राजा हुमायूँ प्रभावीत झाले होते त्यामुळे हुमायूँने आपल्या दरबारामध्ये बैजुला गायकाचे महत्वाचे स्थान दिले होते. हुमायूँ यांच्या काळात सुफी भक्ती संगीत अधिक प्रचलीत झाले होते व हुमायूँ अनेक प्रसंगामध्ये सुफी संगीताचे आयोजन करत होते.

इ.स. 1556 मध्ये सम्राट अकबर शासनकर्ते झाले होते त्यांनी कुठलेही शिक्षणाचे धडे घेतले नव्हते परंतु त्यांना इतर गोष्टीचे खुप ज्ञान होते. अकबर हे एक महान संगीतज्ञ असुन त्यांचा काळ

Received: 05-02-2026 | Accepted: 12-03-2026 | Published: 19-03-2026 | www.ijeml.com

हा संगीताचा सुवर्णकाळ होता. यांच्याही दरबारामध्ये अनेक संगीतज्ञ होते. उदा. तानसेन, बैजुबावरा, रामदास, सुबहान खान इत्यादी अशा कलाकारांनी अकबराचा दरबार भरलेला असायचा. संगीतकारांना धन, पुरस्कार, उपाधी देऊन हयांचा सन्मान केल्या जात होता व राजा अकबर स्वत- संगीतज्ञ होते. लेखक अबुल फजल यांच्या मतानुसार राजा अकबर को संगीत का इतना ज्ञान था की जीतना अन्य किसी राजा को नही. राजा अकबराना चित्रकला व संगीताची खुप आवड होती. त्यांनी आपल्या दरबारामध्ये चित्रकलेच्या माध्यमातुन संगीताची चित्रे उभारली होती. राजा अकबर आपल्या दरबारामध्ये कलेचे विशेषतज्ञ, संगीताची चर्चा, धार्मीक संगीत इत्यादी घडामोडी होत होत्या. राजा अकबराचे म्हणणे असे होते की. धार्मिक संगीत ऐकल्यामुळे धर्म शक्तीशाली होते हा त्यांचा विश्वास होता. अशाप्रकारे अकबरांनी पन्नास वर्षापर्यंत देशावर राज्य केले.

राजा अकबराच्या नंतर इ.स. 1605 मध्ये सम्राट जहाँगीरने राजसत्ता सांभाळली होती. राजा जहाँगीरचे सितार वाद्यावर अधीक प्रेम होते व धृपद, गजल आणि कव्वाली ऐकण्याचा छंद होता. त्यांच्या दरबारात आठवडयातुन एक दिवस संगीत मैफील होत होती आणि दरबारात अनेक गायक वादक. नर्तक राहत होते व पुरस्काराने सन्मानीत करत होते तसेच जहाँगीरची पत्नी नुरजहाँला सुध्दा संगीत आवडत होते व नुरजहाँ कविता करण्यात माहीर होती. नुरजहाँ सकाळी कविता लिहत होती आणि ती कविता संध्याकाळी जहाँगीरला ऐकवत होती. तसेच जहाँगीर सुध्दा गझल लिहीत होता व राणी नुरजहाँला ऐकवत होता आणि ती गझल नुरजहाँ कडून गावुन घेत होता.

त्यानंतर जहाँगीरचा पुत्र शाहजहाँ याने इ.स. 1628 मध्ये राजसत्ता सांभाळली होती. राजा शाहजहाँ सितार व गायकाचे जानकार होते. त्यांच्या दरबारात ते संगीत मैफील, संगीताची स्पर्धा व रात्रीच्या वेळेला संगीत समारोहाच्या वेळेला हिंदु - मुस्लीम संगीतकरांना बोलावत असे. शाहजहाँच्या दरबारात सुध्दा अनेक संगीतज्ञ राहत होते. शाहजहाँ भजन, धृपद, ख्याल, कव्वाली गायन ऐकत होते. संगीतकारांना उपाधी, त्यांचा सन्मान करत होता. त्याच बरोबर शाहजहाँला स्थापत्य कला अधीक

आवडत होती. शाहजहाँने आपली पत्नी मुमताजच्या आठवणीमध्ये एक महल बनविला होता. त्या राजमहलाला पाहुन शाहजहाँने अनेक गीते रचली होती.

इ.स. 1658 मध्ये शाहजहाँचा मुलगा औरंगजेबानी शाहजहाँला बंदी बनवुन कारागृहात टाकले होते व स्वत:च्या भावाची हत्या करून स्वत: राजसिंहासनावर बसले होते. वयाच्या आठ नऊ वर्षापर्यंत संगीतकलेचा आस्वाद औरंगजेबानी घेतला होता आणि इ.स. 1659 मध्ये आपला राज्यभिषेक उत्सहामध्ये केला होता व राज्याभिषेकच्या घटनेवर अनेक दिवस संगीत गायल्या जात होते. संगीतकारांना विविध उपाधीने सन्मानीत केले जात होते. त्याच्याही दरबारात अनेक संगीतज्ञ राहत होते. औरंगजेबाची संगीत कलेसंबंधी चांगली भुमीका होती. परंतु संगीतकारांनी शाहजहाँला संगीतात मग्न करून काही कागदपत्रावर चुकीच्या सहया घेतल्या होत्या हे कृत्य ओरंगजेबाने पाहीले होते त्यामुळे त्यांना संगीताची अत्यंत चिड आली होती हयाच कारणामुळे राजदरबारामध्ये संगीतावर बंदी घालण्यात आली व संगीताचा निषेध केला व औरंगजेबाने एक आदेश काढला की संगीतातील कलाकार राजदरबारामध्ये येऊ शकतात पण ते आपले संगीत प्रदर्शीत करू शकणार नाहीत. एक दंतकथेनुसार राज्यात संगीतातील कलाकारांनी औरंगजेबाच्या महालाजवळून संगीताची अंतयात्रा काढली होती. तेव्हा औरंगजेबाने खिडकीतुन ती अंतयात्रा पाहीली असता विचारले की कोन मरण पावले, हा कोणाचा मृतदेह आहे त्यावर लोकांनी उत्तर दिले की, जाहपनाह ! यह संगीतकला की शव यात्रा है, जिसने राजाश्रय छिन जानेपर सिसक सिसक कर प्राण दे दिये है । त्यावेळेस सम्राटाने उत्तर दिले की, “इसे कब्रीस्तान मे ले जाकर इतनी गहरी कबर मे दफनाया जाए की फीर कभी निकल न सके ।”

**ब) मुगलकालीन अकबर यांच्या काळात घडलेल्या चमत्कारीक घटना :-**

लेखक अबुल फजल यांच्या मतानुसार राजा अकबर हयांच्या दरबारात 36 संगीतज्ञ होते. त्यामध्ये प्रसिध्द गायक तानसेन व बाजबहादुर होते. स्वत: अकबर सुध्दा नगाडा वाजत होते त्याच काळात संगीताव्दारे अनेक चमत्कार घडल्याचे दिसुन येते उदा. जंगलातुन पशु - पक्षांना बोलावणे,

पर्यावरणात बदल घडवुन आणणे, बिमार व्यक्तीला बरे करणे, कोमात गेलेल्या व्यक्तीला वापस आणणे, तसेच राग मल्हार गायल्याने पाऊस पाडणे इत्यादी.

**निष्कर्ष :-**

मुगलकालीन संगीत कलेचा अभ्यास केला असता असे दिसुन येते की, सर्व मुगलकालीन राजा महाराजांना कमी - अधीक प्रमाणात संगीत कलेची आवड होती. काही राजे संगीत कलेत अती मग्न होऊन जात होते तर काही राजे गायक, कवी वाद्य वाजविण्यात निपुन होते परंतु एकच राजा होता तो म्हणजे औरंगजेब की त्यांनी काही वर्षापर्यत संगीतावर प्रेम केले त्यानंतर संगीताचा तिरस्कार करू लागला होता. मुगल काळात संगीताच्या माध्यमातुन अनेक प्रकारच्या चमत्कारीक घटना घडल्याच्या दिसुन येतात परंतु मुगल काळात घडलेल्या चमत्कारीक घटना आज मुगल काळातील जे संगीत गायल्या जात होते. जसे संगीतातील धृपद, धमार, तराना, गझल, भजन, आजही आनंदाने गायील्या जाते त्यात कुठल्याही प्रकारचा बदल झाल्याचा दिसुन येत नाही. तसेच आज वर्तमान काळात संगीत कलेचा प्रभाव अनेक व्यकतीवर झाल्याचा दिसुन येतो हे स्पष्ट आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

1) मिश्रा डॉ. ज्योती (2013), मध्ययुगीन संगीत समग्र, अनुभव पब्लिशिंग हाऊस, इलाहाबाद.
2) जोशी उमेश (2018), भारतीय संगीत का इतिहास, कल्पना प्रकाशन दिल्ली.
3) शर्मा भगवन शरण (2001), भारतीय संगीत का इतिहास, संगीत कार्यालय हाथरस.
4) कुमार डॉ. आशीष, (2022), भारतीय संगीत का व्यवसायीक विकास, संजय प्रकाशन, नई दिल्ली.
5) शर्मा डॉ. निधी, (2016), हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत एवं समाज, राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
6) गर्ग डॉ. लक्ष्मीनारायण (2013), मुसलमान और भारतीय संगीत अंक, संगीत कार्यालय हाथरस.

7) दिक्षीत डॉ. रश्मि (2012), मध्यकाल के संगीतज्ञ व कवियो का हिंदुस्थानी संगीत व काव्य मे योगदान, अनुभव पब्लीशिंग हाऊस, इलाहाबाद.

8) कालेकर डॉ. (कु) शरयू, (2005), मानचित्रो व्दारा संगीत की ऐतिहासीक यात्रा ग्यारहवी से बिसवी शताब्दी तक, अभिषेक पब्लीकेशन्स, चंडीगढ.

9) गौड चिन्मय (2023), भारतीय शास्त्रीय संगीत संगीतमय चिन्मय, (भाग - 1)

10) मदन डॉ. पन्नालाल, मदन डॉ. मीरा (2021), संगीत कला का इतिहास, अभिषेक पब्लीकेशन्स, चंडीगढ.